# प्रेसनोट

धुळे
दि.२७/०४/२०१६

देवपुर पोलीस ठाणे वर्ग ५ गु.र.नं.६६/२०१५ भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्राो.दाखल असुन सदर गुन्हयाचे फिर्यादी श्री.दिलीप शंभुप्रसाद चौरसिया हे बाहेर गावी गेलेले असतांना दि.११/०७/२०१५ रोजी धुळे शहरात,देवपुर पंचवटी भागात,अज्ञात चोरटयांनी त्यांचे राहते घरास लावलेले कुलूप तोडुन घरात प्रवेश करून सोन्या/चांदीचे दागीने व रोख २०,०००/-रूपये असे ३,४२,०००/-रूपयाचा ऐवज,घरफोडी करून चोरू नेलेला होता. त्या बाबत श्री.चौरसिया यांनी अज्ञात चोरटया विरूध्द फिर्याद दाखल केली आहे.

श्री.साहेबराव पाटील पोलीस अधिक्षक धुळे यांचे आदेशाने सदर घरफोडीच्या गुन्हयाचा तपास देवपुर पोलीस कडुन स्थानिक गुन्हे शाख धुळे कडेस सोपविण्यात आला होता.श्री.देविदास शेळके पोलीस निरीक्षक स्था.गु. शाखा धुळे यांनी पोसई/नासिर पठाण,असई/व्हि.पी.पाटील,पोहेकॉ राजेंद्र सोनवणे,पोहेकॉ/मोहसीनोद्दीन काझी,पोहेकॉ/ सुशिल देसले सर्व नेमणुक स्था.गु.शाखा धुळे यांची सदरचा गुन्हा उघडकीस आणणे कामी निवड करून,पथक तयार केले.त्या पथकास श्री.साहेबराव पाटील पोलीस अधिक्षक धुळे,श्री.चंद्रकात गवळी अपर पोलीस अधिक्षक धुळे, श्री.हिम्मतराव जाधव उप विभागीय पोलीस अधिकारी धुळे शहर,श्री.देविदास शेळके पोलीस निरीक्षक स्था.गु. शाखा धुळे यांनी मार्गदर्शन केले.त्या प्रमाणे पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी धुळे शहरातील अश्या प्रकारचे गुन्हे करणारे गुन्हेगाराची माहीती काढुन त्यांचेवर नजर ठेवुन,नियाज अहमद अजीज खान उ.व.३० रा.पुर्व हुडको, हिदायत मशिद समोर चाळीसगाव रोड धुळे यानेच सदरची घरफोडी चोरी केल्याचा छडा लावला व त्याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेऊन बोलते केल्या नंतर त्याने सदरची चोरी केल्याची कबुली दिली.त्या वरून वरील पथकाने त्याचे ताबेकब्जातुन चोरीस गेलेलामाल सोन्या/चांदीचे दागीने असे २,९०,८००/रूपयाचा माल हस्तगत करून वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शना खाली सदरची घरफोडी चोरी उघडकीय आणली असुन, सदर गुन्हयाचा अधिक तपास पोसई/नासिर पठाण हे करीत आहेत.

त्याच प्रमाणे वरील पथकाने या पुर्वी धुळे तालुका पोलीस स्टेशन गु.र.नं.९९/२०१६ भा.द.वि. कलम ४५४,३८० प्राो व मोहाडी पोलीस स्टेशन गु.र.नं.९४/२०१६ भा.द.वि.क.४५४,३८० प्राो.दाखल गुन्हयात समांतर तपासात अन्वरखॉ नासीरखॉ पठाण उ.व.३२ रा.उंदीरखेडा ता.जि.जळगांव,२)विकास ऊर्फ विक्की मोहन चौधरी उ.व.२९ रा.दंडवालाबाबानगर मोहाडी यांचे कडुन वरील दोन्ही गुन्हे उघडकीस आणले असुन वरील आरोपीता कडुन ५२,८००/-रू.किमतीचा माल सोन्या/चांदीचे दागीने व रोख रक्कम असा हस्तगत करून दोन्ही गुन्हे उघडकीस आणले आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास अनुक्रमे पोसई/एन.आर.मोरे नेम.धुळे तालुका पो.ठाणे,पोसई/गवई नेमणुक मोहाडी पो.ठाणे हे करीत आहे.